**<u>राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर</u>**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४०८/ सोलापूर | श्री.सुनिल सुखदेव काटे मु.पो.चिणके, ता.सांगोला, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, सांगोला, जि. सोलापूर | तहसीलदार, सांगोला, जि.सोलापूर | तालुक्यातील गावांमधील संजय गांधी, इंदिरा गांधी, श्रावण बाळ, वृध्दापकाळ व इतर सर्व पेन्शन योजनांचा मंजूरी दिनांक, शिफारस, मासिक हप्ता, प्रत्येक योजनांवरील खर्च, व लाभार्थी यादी. | काही माहिती मिळाली, उर्वरीत माहिती आठ दिवसांत मिळावी, असे अपिलकर्त्याचे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०५.२००९ रोजीच्या विशेष अपील निर्गत कार्यक्रम प्रपत्रासोबत सादर केले आहे. |
| २ | १४११/ सोलापूर | श्री.सुनिल सुखदेव काटे मु.पो. चिणके ता.सांगोला, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, सांगोला, जि. सोलापूर | तहसीलदार, सांगोला, जि.सोलापूर | तालुक्यातील २००५ -२००६ पासून वाळू संदर्भात कोणावर कारवाई केली, दंडाची रक्कम, वाहन क्रमांक, मालकाचे नाव, केलेले पंचनामे, शासकीय रिपोर्ट, झेरॉक्स प्रतींसह माहिती. | काही माहिती मिळाली, उर्वरीत माहिती आठ दिवसांत मिळावी, असे अपिलकर्त्याचे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०५.२००९ रोजीच्या विशेष अपील निर्गत कार्यक्रममधील प्रपत्रासोबत सादर केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १४२६/ सोलापूर | श्री.राजन तानाजी घाडगे गवत्या मारूती चौक, मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, मोहोळ, जि. सोलापूर | तहसीलदार, मोहोळ, जि.सोलापूर | तहसीलच्या आवारात हॉटेल आहे का, ते कोणाच्या मालकीचे, ते कोणत्या विभागा-च्या अखत्यारीत आहे. किती भाडे घेतले जाते. हॉटेल चालू झाल्या पासून आज पर्यंत किती भाडे वसूल केले त्या तारखांसह माहिती व इतर एकूण ९ मुद्यांची माहिती. | जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुन्हा अवलोकनास दिल्याने माहिती मिळाली, काही तक्रार राहिलेली नसल्याचे अपिलकर्त्याने दि. ०५.०५.२००९ च्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमामधील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | १३५७/ सोलापूर | श्री.सुरेश श्रावण बडेकर पारवे वस्ती खरबडे प्लॉट, कुर्डुवाडी, ता.माढा, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, माढा, जि. सोलापूर | तहसीलदार, माढा, जि.सोलापूर | खणीकर्म विभागाद्वारा दगड, वाळू माती, माढा तालुक्यात किती उचलली जाते, अधिकृत परवाना धारकांची यादी. परवाना धारकांव्यतिरिक्त [illegible] अनधिकृतपणे माती, दगड, वाळू उपसा करणाऱ्यांची यादी, [illegible] [illegible] [illegible] किती रॉयल्टी किती [illegible] माहिती. | अपीलकर्त्याने दि. ०५.०५.२००९ च्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमामधील प्रपत्रासोबत निवेदन सादर करून माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे व जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास यापूर्वीच माहिती दिली असल्याचे व अपिलकर्त्याची माहिती मिळाल्याचे निवेदन प्रपत्रासोबत सादर केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १३४६/ सोलापूर | श्री.सतीश बाबूराव भगत आझाद चौक, अकलूज, ता.माळशिरस, जि. सोलापूर | अप्पर चिटणीस, (कुळकायदा), जिल्हाधिकारी कार्यालय. जि.सोलापूर | निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर | मौजे गणेशवाडी (अकलूज), ता माळशिरस येथील स. नं. [illegible] क्षेत्र [illegible] ४९ हे [illegible] मंजूर [illegible] जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगी बाबत केलेली कार्यवाही. | प्रस्तुत कार्यवाहीबाबत माहे मे २००९ अखेर निर्णय घेण्याबाबत अपीलकर्ता व सहायक जन माहिती अधिकारी यांच्यात एकमत झाले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

आदेश

१) वरील तक्त्यातील अपिले अनु क्र. १ ते ४ (अपील क्र १४०८, १४११, १४२६, १४५७ व १३४६/ सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र १४०८ व १४११ मध्ये अपीलकर्त्यास उर्वरीत माहिती आठ दिवसांत द्यावी. अनुपालन अहवाल हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत आयोगास सादर करावा.अन्यथा अपीलीय जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीसह अन्य तद्नुषंगिक कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि. ३०.०६.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४३१ /पुणे | श्री. विकास भिमराव गायकवाड मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि. पुणे | गट शिक्षण अधिकारी, शिक्षण विभाग, पंचायत समिती, इंदापूर, जि.पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर, जि.पुणे | सेतू शाळेतील विद्यार्थी ज्या शाळेत गेले त्या शाळेतील सदर विद्यार्थ्यांच्या बोनाफाईडच्या छायाप्रती तसेच श्री. जंजीरे व अन्य विस्तार अधिकारी यांनी ज्या ज्या ठिकाणी भेटी दिल्या त्या व्हिजीट बुकाच्या छायांकित प्रत | माहिती उपलब्ध झाली असल्याने अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने दि.२१.१०..२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' तील प्रपत्रात नमूद केले |
| २ | १७९२ / पुणे | श्री. संजय गणपतराव राजे निंबाळकर मु. वडगाव निंबाळकर, ता. बारामती, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, बारामती, ता.बारामती, जि.पुणे | तहसीलदार, बारामती, ता.बारामती, जि.पुणे | मौजे . वडगाव निंबाळकर, ता. बारामती या गावातील खाते नं.१७२ या शेतजमिनीबाबत दि.७.५.१९३६ रोजी सरकारी दप्तरी असणाऱ्या नोंदीची माहिती | उपलब्ध माहितीमुळे समाधान झाले असल्यामुळे अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने दि. ३०.४.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १८४९ /पुणे | श्री. भालचंद्र रत्नाकर रायरीकर द्वारा ज.अ.ढेकणे, १३४/४/१३, एमएसईबी, जवळ, रेंजहिल मार्ग, शिवाजीनगर, पुणे-५ | तहसीलदार (कुळकायदा शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | उप-जिल्हाधिकारी (कुळकायदा शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ खालील नियम १९७१ अन्वये सुधारित ७/१२ फॉर्ममध्ये पुर्वीचे उतारे लिहिण्या बाबतचे आदेश, पिकांचे नोंदवहीत कुळाची नोंद अभिलिखीत करण्याची अथवा अनधिकाराने कमी केल्यास करावयाच्या तक्रारीची कार्यपध्दती | जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तराने समाधान न झाल्यास अर्जदाराने प्रथम अपील करणे आवश्यक आहे. |
| ४ | १९९६ / पुणे | श्री. संजय गणपतराव राजे निंबाळकर रा. वडगाव निंबाळकर, ता. बारामती, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, बारामती, ता.बारामती, जि.पुणे | तहसीलदार, बारामती, ता.बारामती, जि.पुणे | श्री. जगू ऊर्फ गणपतराव कृष्णा निंबाळकर यांचे नावे असलेल्या जमिनीचे ७/१२ उताऱ्याच्या नकला | अपील निकाली काढावे असे दि. ३०.४.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २०८४ /पुणे | श्री. प्रकाश दत्तात्रय मांगले दत्तप्रभा, ४२, विवेक सोसायटी, पद्मावती, पुणे-९ | जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता (पथ), पुणे महानगर-पालिका, पुणे | अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता (पथ), पुणे महानगर-पालिका, पुणे | पुणे सातारा रस्त्यावरील सारंग बस स्टॉप ते दाते बसस्टॉप व अन्य फूटपाथचे काम पूर्ण करावे त्या अनुषंगिक माहिती | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. अपीलकर्त्याची मूळ मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.११.०७ व दि. २८.१२.२००७ रोजी माहिती दिली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २१८० /पुणे | सौ.सुषमा कृष्णा जोशी रा.दौलत वसाहत, इ.क्र.१/४, कर्वेरस्ता, कोथरूड, पुणे-२९ | सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, पुष्पा हाईट्स, बिबवेवाडी कॉर्नर, पुणे-३७ | सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) पुणे शहर, तहसील कार्यालय आवार, पुणे-२ | सदनिका.क्र.१९३/३, रजिस्ट्रेशन दि. ११.१२. ९५ संदर्भातील हस्तांतरण फेरबदल, वारसांची नोंद इ. माहिती | कागदपत्रांचा शोध घेऊन ती अपीलकर्त्यास उपलब्ध करून देण्यात येतील, असे जन माहिती अधिकारी यांनी दि.२३.१२. २००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ७ | २४२६ / पुणे | श्री. शामसुंदर कृष्णाजी टपले कल्पतरू हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.३५, चंदननगर, खराडी रोड, पुणे-१४ | सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, पुष्पा हाईट्स, बिबवेवाडी कॉर्नर, पुणे-३७ | सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) पुणे शहर, तहसील कार्यालय आवार, पुणे-२ | दस्त क्र.७४६१/८२ व ७४६२/८२ या दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रती | कागदपत्रांचा शोध घेऊन ती त्वरित उपलब्ध करून देण्यात येतील असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २९.१.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनु.क्र. १ ते ७ अपिले (क्र. १४३१, १७९२, १८४९, १९९६, २०८४, २१८० व २४२६ / पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. **अपील क्र. २१८०, २४२६/ पुणे मध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती देण्याबाबत नमूद /आदेशित केले आहे, त्यानुसार संबंधित अपीलकर्त्यास विहित** मुदतीत माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास आठ दिवसात सादर करावा. अशी पूर्तता न **केल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अवये संबंधित जन माहिती अधिकारी** व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि. २०.६.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या श्री. राजेंद्र बनसिध्दप्पा गायकवांड ब्लॉक क्र. एम - १६,सुंदरमनगर, विजापूर रोड सोलापूर यांच्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अपील क्रमांक | जनमाहिती अधिकारी | अपिलीय अधिकारी | मूळअर्जातील माहिती (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | १४४१/ सोलापूर | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली | विभागीय चौकशीकामी चौकशी अधिकारी यांची नेमणूक शासन निर्णय क्र. साडीआर - ११८७/ १५८१ / ४५/११ दि. २९.१२.८८ डावलून का करण्यात आली. याची माहिती. | विषय प्रशासकीय कार्यवाहीचा आहे, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. |
| २ | १४४२/ सोलापूर | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली | शिस्तभंगाची कार्यवाही करताना निर्धारित केलेल्या बाबी दर्शवि - णा-या कागदपत्राच्या प्रमाणित प्रती शासन निर्णय क्र. साडीआर - ११९६ दि. १६.०४.९६ मधील क्र १ नुसार कार्यवाही केली की नाही, याची माहिती. | विषय प्रशासकीय कार्यवाहीचा आहे, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १४४३/ सोलापूर | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली | नियमबाहयपणे झालेल्या व आदेशित केलेल्या विभागिाय चौकशीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहन कालावधी, परकीय सेवा व निलंबन) नियम, १९८१ मधील नियम ४० चा उपनियम ४ च्या कार्यवाहीची माहिती, म. ना. से. (शिस्त वअपिल) नियम, १९७९ मधील नियम ८ च्या कार्य-वाहीची माहिती. | विषय प्रशासकीय कार्यवाहीचा आहे, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ते ३ (अपील क्र.१४४१, १४४२ व १४४३/सोलापूर) दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपिल क्रमांक (१४४१, १४४२ व १४४३/सोलापूर) मध्ये अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ३०.१२.२००८ रोजी दिलेल्या आदेशा नुसार अपीलकर्त्यास मुद्दा क्र १ व २ ची माहिती देण्यात आल्याबाबतचा अनुपालन अहवाल उक्त आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत आयोगास सादर करावा,

**पुणे**
**दि.३०.०६.२००९**

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४७९ / पुणे | श्री. विठ्ठल गोविंद झुंजूरके ४३७, बुधवार पेठ, पुणे-२ | निवासी नायब तहसीलदार, भोर ता. भोर, जि.पुणे | तहसीलदार, भोर ता. भोर, जि.पुणे | श्री. प्रताप नारायण खोपडे, रा. नाझरे, ता. भोर यांच्या जन्म तारखेबाबत माहिती | सदर अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १४४७ / पुणे | श्री. अशोक गणपतराव गायकवाड मु.गोऱ्हे बु. पो.डोणजे, सिंहगड रोड, ता.हवेली, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, जुन्नर ता. जुन्नर, जि.पुणे | तहसीलदार, जुन्नर ता. जुन्नर, जि.पुणे | मौजे नेतवड (माळवाडी), ता. जुन्नर येथील गट नं. २२६ च्या बेकायदेशीर खरेदी-विक्री व्यवहाराबाबत एकूण पाच मुद्दयांची माहिती | ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |
| ३ | १४४२ / पुणे | श्री. बबन आप्पाजी बांगर रा.कुकडी कॉलनी, नारायणगाव, ता. जुन्नर, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, जुन्नर ता. जुन्नर, जि.पुणे | तहसीलदार, जुन्नर ता. जुन्नर, जि.पुणे | मौजे बेल्हे, ता. जुन्नर येथील गट नं.८०/१, ८१/१ब/२ चे माहे ऑक्टोबर २०४ मध्ये खरेदीखत झाले. सदर खरेदीस हरकत घेतल्याबाबत दि.२३.११.२००४ रोजी व मंडल अधिकाऱ्यांकडे | अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जुन्नर यांनी दि. १७.११.२००७ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दि. २१.३.२००५ रोजी अर्ज करुन संबंधित पुरावे दाखल केले तरी दि. ३०.३.२००५ रोजी नोंद घेण्यात आली. त्यासंबंधीचे जाब-जबाब व कोणत्या नियमाच्या आधारे नोंद करण्यात आली या तपशिलाच्या प्रती मिळणेबाबत | |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील नमूद केलेली अपिले (अनु. क्र. १४७९, १४४७ व १४४२ ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
**दि. १६.६.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शाम साधू ससाणे
वाल्मिकी वस्ती, रामटेकडी, पुणे १३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह महापालिका आयुक्त (नावियो),
नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रकल्प अधिकारी,
नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९९+१७४६/ पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शाम साधू ससाणे
वाल्मिकी वस्ती, रामटेकडी, पुणे १३

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह महापालिका आयुक्त (नावियो),
नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.अशोक विष्णू कळमकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.९.२००७, ५.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.१०.२००७, १.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मागासवर्गीय कल्याणनिधीबद्दल मिळालेल्या माहितीविषयी. दि.२४.११.२००४ रोजी मागासवर्गीय कल्याणनिधी तरतूद व खर्च याविषयीचा तक्ता उपलब्ध करुन देण्यासाठी सहाय्यक आयुक्त यांना मुख्यलेखपाल कार्यालय यांनी कोणती माहिती उपलब्ध करुन दिली. त्याच्या प्रती. तसेच याबाबत आपल्या खात्याकडून मुख्य लेखापाल कार्यालयास सदर माहिती उपलब्ध करुन देण्याबद्दल जी मागणी केली त्याच्या प्रती. | |

## विवेचन

पुणे महानगरपालिकेच्या समाजकल्याण विभागाच्या अंतर्गत ब्यूटी पार्लर प्रशिक्षणाची ऊर्वरित ५०टक्के रक्कम मिळण्याबाबत हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकार संस्थेने केलेला अर्ज व मागासवर्गीय कल्याणनिधी याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.शाम साधू ससाणे यांनी दोन स्वतंत्र अर्जांद्वारे जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे मागितली होती. परंतु आपल्याला चुकीची, अपूर्ण, हास्यास्पद व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली, या कारणावरुन श्री.ससाणे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सह महापालिका आयुक्त(नावियो), नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. दिलेली माहिती योग्य असल्याचे ठरवून अपिलीय प्राधिकारी यांनी अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री.ससाणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

मागासवर्गीय कल्याण निधीची तरतूद व खर्च याबाबत सहआयुक्त श्री.अ.वि.कळमकर यांनी श्री.ससाणे यांच्या अर्जावर तक्ता उपलबध करुन दिला. मुख्य लेखापाल कार्यालयाने उपलब्ध

करुन दिलेल्या माहितीवरुन ही माहिती देण्यात आल्याचे त्यासोबतच्या पत्रात म्हटले आहे. मुख्य लेखापाल कार्यालयाने दिलेल्या माहिती बाबत संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रती आपण मागितल्यानंतर ही माहिती समक्ष चर्चा करुन घेण्यात आल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी दिले आहे. हे उत्तर खोटे आहे, कारण श्री.कळमकर यांनी आधी दिलेल्या माहितीला कोणताही आधार नाही, असे प्रतिपादन श्री.ससाणे यांनी केले. मुख्य लेखापालांशी चर्चा करुन ही माहिती तयार केली असेल तर त्यांच्या सहीचे तसे निवेदन आपल्याला द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

ब्यूटी पार्लर प्रशिक्षण वर्गाच्या संदर्भात आपण अध्यक्ष असलेल्या हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेची ५० टक्के रक्कम श्री.कळमकर यांनी थांबविली ती देण्याविषयी आपल्या संस्थेने महानगरपालिका आयुक्तांना केलेल्या अर्जावर महापालिका आयुक्तांनी काय कार्यवाही केली याची माहिती मूळ अर्जातील मुद्देनिहाय व आयुक्त कार्यालयाकडूनच मिळावी. तसेच संपूर्ण विषयातील सत्यता पडताळूनच अर्जाचे उत्तर दिले जावे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन श्री.ससाणे यांनी केले.

जन माहिती अधिकारी पद हे सध्या रिक्त असल्यामुळे आपण (अपिलीय प्राधिकारी तथा सह महापालिका आयुक्त (नावियो), नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका) सुनावणीला उपस्थित असल्याचे श्री.कळमकर यांनी स्पष्ट केले. श्री.ससाणे यांना मूळ कागदपत्रानुसार योग्य ती माहिती देण्यात आलेली आहे. तक्रार अर्जावरील कार्यवाही हा स्वतंत्र प्रशासकीय कार्यवाहीचा विषय आहे. महानगरपालिका आयुक्तांनी या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात आली आहे. तसेच मागासवर्गीय कल्याण निधीबाबतही दिलेली माहिती योग्य असून दोन्ही अपिलांच्या संदर्भात आवश्यक वाटल्यास श्री.ससाणे संबंधित अभिलेखाचे अवलोकन करु शकतात, असे प्रतिपादन श्री.कळमकर यांनी केले.

माहितीच्या अधिकारात सन २००२ पासून आपण अनेक वेळा माहिती मागत आल्यामुळे मागासवर्गीय कल्याण निधीची जबाबदारी असणाऱ्यांची मनमानी बऱ्याच प्रमाणात कमी झालेली आहे. त्यामुळेच आपण संस्थेचे अध्यक्ष असलेल्या हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा संस्थेच्या कामाचे

पैसे अडकवून ठेवण्यात आले आहेत. तसेच दारिद्र्यरेषेखालीलं यादीतील आपले नांव रद्द करण्यासाठी याच अधिकाऱ्यांनी प्रयत्न चालविला आहे असेही श्री.ससाणे यांनी लेखी व तोंडी निवेदन केले. मात्र अशा प्रकारची कोणतीही कृती आपण केलेली नाही. श्री.ससाणे यांच्या संस्थेतर्फे महिलांना दिले गेलेले प्रशिक्षण अतिशय अपुरे व कमी दर्जाचे असल्याचे परीक्षेत आढळल्यामुळेच प्रशिक्षणाची ऊर्वरित ५०टक्के रक्कम आदा करण्यात येणार नाही, असे श्री.ससाणे यांना दि.५.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते, असे श्री.कळमकर यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

श्री.ससाणे यांच्या विविध अर्जांवर जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती देण्याबाबत विहित मुदतीत कार्यवाही केलेली आहे, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. मात्र आपण मांडलेल्या मुद्दयांना पुष्टी देणारी अशीच माहिती व आपण म्हणतो त्या अधिकाऱ्यांच्याच सहीने मिळावी असा श्री. ससाणे यांचा आग्रह असल्याचे त्यांच्या लेखी व तोंडी निवेदनातून दिसून येते. संबंधित तक्रारीबाबत महानगरपालिका आयुक्तांनी व अधिकाऱ्यांनी (मुख्यत: श्री.कळमकर यांनी) केलेली प्रशासकीय कार्यवाही योग्य नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे व म्हणून दिलेली माहिती चुकीची असल्याचे त्यांचे प्रतिपादन आहे. माहिती चुकीची असण्याबाबत कोणतेही पुरावे त्यांनी सादर केलेले नाहीत. मात्र कार्यवाही मान्य नसणे हा 'माहिती'चा भाग मानता येणार नाही. तरीही त्यांच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती तीन दिवसात देण्याचा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार श्री.ससाणे यांना त्यांच्या अर्जावरील कार्यवाहीबाबतचा संपूर्ण तपशील दि.१८.८.२००८ रोजी दिल्याचे श्री.कळमकर यांनी आयोगाला सादर केले आहे. तसेच पुणे महानगरपालिकेतील मागासवर्गीय कल्याण निधीबाबतची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ अन्वये देशातील विविध प्रणालीमध्ये नेटवर्कमार्फत जोडले जाण्याची मागणी श्री.ससाणे यांनी अन्य तक्रार अर्जांद्वारेही केली होती. संबंधित तक्रारींची दखल घेण्यात आली असून पुणे

महानगरपालिकेच्या वेबसाईटवर ही माहिती प्रसिध्द असल्याचे श्री.कळमकर यांनी दि.२५.८.२००८ च्या निवेदनाद्वारे आयोगाला कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.६.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५०० / पुणे | श्री. तुकाराम विष्णू कवडे रा.१७/अे.सी./३ इमारत, सूर्य लोकनगरी, वेदवाडी, हडपसर, पुणे-१३ | निवासी नायब तहसीलदार, हवेली तालुका, शुक्रवार पेठ, पुणे-२ | तहसीलदार, हवेली तालुका, शुक्रवार पेठ, पुणे-२ | घोरपडी गाव, पुणे-१ येथील पाटील वतन रद्द करणे संदर्भात एकूण १३ मुद्दयांबाबत सविस्तर माहिती | आवश्यक ती माहिती मिळाली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे, असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १९५२/ पुणे | श्री. सुरेश काशिनाथ कोद्रे ९५/७९३, संध्यानील सोसायटी, महर्षीनगर, पुणे-३७ | निवासी नायब तहसीलदार, पुणे शहर, तहसील कार्यालय, पुणे शहर, शुक्रवार पेठ, पुणे | तहसीलदार, पुणे शहर, तहसील कार्यालय, पुणे शहर, पुणे | मौजे मुंढवा या गावाचे फेरफार नं.१०८० व त्यापूर्वीच्या फेरफाराची मूळ पुस्तिका तसेच फेरफार नं.५६६,८७१, ९०३ व १०५७ व हुकूमनामा नं.WTN/ WS/९४१/५९ च्या सांक्षाकित प्रती | अपीलकर्त्यास १० दिवसात माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २७८५/ पुणे | श्री.दिपक कांतीलाल कर्नावट मु.पो.वाघोली, ता.हवेली, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता. हवेली, जि. पुणे | तहसीलदार, हवेली, ता. हवेली, जि. पुणे | मौजे वाघोली स.नं.३०९ चे दप्तरी नोंद होणेबाबत | अपीलकर्त्याची मागणी ही प्रशासकीय कार्यवाही बाबतची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. सदरची बाब अपीलकर्त्याने मान्य केली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ३०१०/ पुणे | श्री. चांदमल देवीचंद गांधी सि.स.नं.२६२६/१ , पार्श्वनाथ हौ.सोसायटी, नाशिकफाटा, कासारवाडी, पुणे | नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड, जि.पुणे | अधीक्षक, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-१ | मौजे भोसरी, ता.हवेली येथील स.नं.४३४/२ व सि.स.नं.२६२६/१ पुढील क्षेत्र १९७३ साली झालेल्या मोजणीनुसार भूसंपादन नकाशा व ॲवार्ड प्रत मिळणेबाबत | अपीलकर्त्याच्या मागणीप्रमाणे मोजणीचे शुल्क भरून मोजणी करण्यात येईल, यास्तव सदरचे अपील निकाली काढण्याबाबत उभय बाजूत एकमत झाले असल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | ३०३३/ पुणे | श्री.योगेश फुलचंद पांडे ए-४, इंद्रराज अपार्टमेंट, शितल हॉटेल-जवळ, एफ.सर. रोड, पुणे-५ | जन माहिती अधिकारी सह्याद्री सह. साखर कारखाना प्रा.लि., यशवंत नगर, ता.कराड, जि.सातारा | प्रादेशिक सह संचालक (साखर), पुणे विभाग, पुणे | सह्याद्री सह. साखर कारखाना द्वारा खुली साखर विक्री प्रक्रिये संबंधी एकूण ८ मुद्दयांची माहिती | मागितलेली माहिती साखर साखर आयुक्तालयामार्फत मिळणार असल्याने अपील निकाली काढावे असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | ३०४६/ पुणे | श्री.विलास अनंतराव भेगडे प्लॉट नं.३, ब्लॉक नं.१, मस्करनीस कॉलनी, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि. पुणे | जन माहिती अधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ, जि. पुणे | मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ, जि. पुणे | तळेगाव दाभाडे नगरपरिषद, हद्दीतील प्लॉट नं.५१, मस्करनीस कॉलनी बांधकाम विभाग ता.मावळ, जि. पुणे | नगर परिषदेशी संबंधित माहिती मिळाली असल्याने अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ७ | ३०५३/ पुणे | श्री. दादाभाऊ आन्ना शिंधे रा.वैदुवाडी, पो.नारायणगांव ता.जुन्नर, जि.पुणे | सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, पुरवठा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | जुन्नर येथील हिंदुस्थान पेट्रोललियम कंपनीचे गॅस डिलर शहा ब्रदर्स यांना देण्यात येणारा साठा व वाटपा बाबत माहिती व कागदपत्रे | अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने अपील निकाली काढण्याचे सर्वानुमते प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ३०५९/ पुणे | श्रीमती अलका शिवाजी वीर रा.पंचायत समिती क्वार्टर क्रं.५, इंदापूर ता. इंदापूर जि.पुणे | कार्यासन अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | उप सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | तापी सह. गृहनिर्माण संस्था मौजे तरंगवाडी, ता.इंदापूर, मधील सदनिका वाटपा संदर्भातील कागदपत्रे व माहिती | शासनस्तरावरील सर्व माहिती प्रात झाली असल्याची बाब अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केली आहे. |
| ९ | ३०६७/ पुणे | श्री. गंगाभिसन भाई ओझा छ.शिवाजी चौक, दौंड, ता.दौड, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, दौड, ता. दौंड, जि. पुणे | तहसीलदार, दौड, ता. दौंड, जि. पुणे | विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडून मौजे दौंड येथील सि.स. नं.१५३३ ते १५४३ या जमिनी बाबत आलेल्या चौकशी अहवालाची प्रत, तसेच अन्य दोन मुद्दयांबाबतची माहिती | सर्व माहिती दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| १० | ३०७८ / पुणे | श्री. रसुल हसेन इनामदार रा.आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे | जन माहिती अधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे | मुख्याधिकारी आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे | आळंदी नगरपरिषद हद्दीतील मिळकत नं.१९६, स.नं. २३२अ/७ मधील बांधकामा-बाबतचे भोगवटा पत्र, ज्या इमारती संदर्भात अनधिकृत बांधकामे पाडण्याचे न्यायालयाने आदेश दिले आहेत, त्या इमारतीच्या मालमत्ता कार्डवर अनधिकृत असा उल्लेख असलेले उतारे इ. माहिती व कागदपत्रे | सर्व माहिती प्राप्त झ ाली असल्याने अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ११ | ३१२० / पुणे | श्री. सुभाष आर. पाटील ३, जेल रोड, येरवडा, पुणे-६ | उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, पुणे-१ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, पुणे-३ | पुणे महानगर-पालिका व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे दरम्यान मौजे फुरसुंगी येथील कचरा डेपो संदर्भात झालेला पत्रव्यवहार व कागदपत्रे इ. माहिती | माहिती दिली असल्याने अपील निकाली काढण्याबाबत सर्वानुमते प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनु.क्र. १ ते ११ अपिले (क्र. १५००, १९५२, २७८५, ३०१०, ३०३३, ३०४६, ३०५३, ३०५९, ३०६७, ३०७८ व ३१२० / पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र.१९५२, मध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती देण्याबाबत नमूद /आदेशित केले आहे, त्यानुसार संबंधित अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास आठ दिवसात सादर करावा. अशी पूर्तता न केल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

**पुणे**
**दि. २२.६.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२३.१२.२००८, २९.०१.२००९ व ३०.०४.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५८९ + १५९०/ पुणे | डॉ.पी.एम.सुळे सचिव, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी पुणे, ९, बंडगार्डन रोड, व्ही.के.जोग मार्ग, पुणे -१ | निवासी नायब तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे -२ | तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे -२ | मौजे वाघोली येथील स.नं.६६/१, ६६/२, ६६/४ चे ७/१२ उतारे सन १९५६ ते १९७४ पर्यंत व त्यावरील फेरफार इ. अनुषंगिक माहिती | माहिती अधिकारातील अर्जाप्रमाणे मागणी केलेल्या माहितीची सध्या गरज राहिली नसल्याने अपील निकाली काढावे असे विनंती पत्र सचिव, डॉ.पी.एम.सुळे मॉडर्न एज्युकेशन सोसायटी पुणे यांनी दि.२९.०४.२००९ रोजी आयोगास सादर केले आहे. |
| २ | २१४५/ पुणे | श्री.नाना देवचंद बोदडे 'हरी ओम कृपा', राहुल पार्क, पाण्याच्या टाकीजवळ, भोसरी, पुणे-३९ | मुख्याध्यापक, ज्ञानराज माध्यमिक विद्यालय, कासारवाडी, पुणे -३४ | शिक्षणाधिकारी (माध्य.), पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ | ज्ञानराज माध्यमिक विद्यालय, कासारवाडी या शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वैयक्तिक मान्यता पत्रांच्या प्रती व बिंदूनामावलीची (रोस्टर) प्रत | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात दि.२३.१२.२००९ रोजी नमूद केले आहे. |
| ३ | २३७६/ पुणे | श्री.विष्णु रविराज साबळे मु.पो.आळंदी देवाची, | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, | अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे जिल्हाधिकारी | श्री.दौलत सदाशिव साबळे मु.पो.कोयाळी तर्फे ता.खेड येथील गट नं.८४ ची मोजणी | जागेची करण्यात आलेली मोजणी मान्य नसून वरिष्ठांकडे अपील करत आहे. हे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ता.खेड, जि.पुणे | राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे | कार्यालय आवार, पुणे-१ | दि.२६.०४.२००७ मो.र.न.३७०५/०७ बाबत माहिती | अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने (दि.२९.०१.२००९ चे) प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | २३९४/ पुणे | श्री.बापूराव संभाजी भरणे मु.पो.गुणवडी, ता.बारामती, जि.पुणे | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, इंदापूर. ता.इंदापूर, जि.पुणे | अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१ | नवा मुठा कालवा वितरिका क्र.४८ गट नं.७९० जुना या गटातील वाडीकरता संपादन केलेल्या क्षेत्राचा नकाशा | अपील निकाली काढण्याबाबत तिन्ही घटकांमध्ये एकमत झाल्याचे प्रपत्रात (दि.२९.०१.२००९) नमूद केले आहे. |
| ५ | २४३९/ पुणे | ॲड. विकास जोशी साई सदन, फ्लॅट नं.२९, ४ था मजला, पुण्याईनगर, धनकवडी, पुणे-४३ | प्रभारी क्षेत्रिय अधिकारी, भूमी आणि जिंदगी, पुणे मनपा, पुणे-५ | अपिलीय प्राधिकारी तथा भूसंपादन व व्यवस्थापन, पुणे मनपा, पुणे-५ | पत्र क्र.DO/NO/MCO/ ३९,दि.१८.०५.२००२ चे अनुषंगाने कार्यालयामधील मूळ प्रकरणांचे निरीक्षणाची मागणी | माहिती प्राप्त झाल्याने अपील निकाली काढावे, अशी अपीलकर्त्यांचे प्रतिनिधी श्री.अनंत देऊ गावडे यांनी (दि.२९.०१.२००९ च्या) पत्रान्वये केली आहे. |
| ६ | २८५०/ पुणे | श्री.शशिकांत विलास कोरे एच-१८/२८६१, महाराष्ट्र हौ.बोर्ड, येरवडा, पुणे-६ | सहायक अधीक्षक अभियंता (१), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | अधीक्षक अभियंता (१), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | खात्यातील वर्णनाप्रमाणे कर्मचाऱ्यांची कार्यालयीन उपस्थिती, बदली, जात-वैधता प्रमाणपत्र, पदोन्नती इ. अनुषंगिक १० मुद्दे | माहितीबाबत एकमत झाल्याचे अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी (दि.०४.०४.२००९ चे) प्रपत्रामध्ये नमूद केले आहे. |
| ७ | २८७० /पुणे | श्री.विजय गोविंद कुरतडकर ४/६६, पी.एम.सी. कॉलनी, साने गुरुजीनगर, सदाशिव पेठ, पुणे-३० | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे शहर, पुणे ५, फायनान्स रोड, | नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, पुणे-१ | नोटीस जा.क्र./सजिनि/चुमुशु प्र.क्र.५७/०८/९२१/०८ व प्र.क्र.२७/०८/९२२/०८ या प्रकरणांची सुरवातीपासून ते अखेरपर्यंतची संपूर्ण माहिती | जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीने समाधान झाले असल्याचे अपीलकर्त्याने (दि.०४.०४.२००९ चे) प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे-१ | | | |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत व अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ७ ( क्रमांक १५८९+१५९०, २१४५, २८५०, २८७०, २३७६, २३९४ व २४३९) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २४-६- २००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १६/ सोलापूर | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी मु. पो. श्रीदत्त रोड, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार,माढा, ता. माढा, जि. सोलापूर | तहसीलदार, माढा, ता.माढा, जि. सोलापूर | सौ. उर्मिला हुकूमचंद भलाणी यांच्या किरकोळ रॉकेल वितरणाचा माहे नोव्हेंबर ०५ ते जानेवारी ०६ पर्यंतचा कोटा त्यांना न देता कोणत्या रॉकेल विक्रेत्यांना जोडला, त्याची तारीख व इतर माहिती. | विहित शुल्क भरून माहिती घेऊन जाण्याचे पत्र अपिलकर्त्याने स्वीकारले नाही, माहिती तयार आहे, अपील कर्त्याने शुल्क भरुन माहिती घ्यावी, असे जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०६.२००८ च्या विशेष अपिल निर्गत कार्यक्रमामधील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १७/ सोलापूर | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी मु. पो. श्रीदत्त रोड, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, माढा, ता. माढा, जि. सोलापूर | तहसीलदार, माढा, ता.माढा, जि. सोलापूर | माढा तालुक्यातील सर्व रास्तभाव व रॉकेल विक्रेते परवाना यादी नाव व पत्यासह, प्रत्येकास असलेल्या शिधाप्रत्रिकाची संख्या. | विहित शुल्क भरून माहिती घेण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी कळविले, परंतु अपिल कर्त्याने पत्र स्वीकारले नाही. अपीलकर्त्याने आवश्यक असल्यास विहित शुल्क भरुन माहिती घ्यावी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १८/ सोलापूर | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी मु. पो. श्रीदत्त रोड, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, माढा, ता. माढा, जि. सोलापूर | तहसीलदार, माढा, ता.माढा, जि. सोलापूर | तहसील कचेरीतील पुरवठा विभागासह सर्व विभागातील कर्मचा-यांची यादी, त्यांच्या कामाचे वाटप. | विहित शुल्क भरून माहिती घेण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी कळविले, परंतु अपिल कर्त्याने पत्र स्वीकारले नाही. अपीलकर्त्याने आवश्यक असल्यास विहित शुल्क भरुन माहिती घ्यावी. |
| ४ | २१/ सोलापूर | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी मु. पो. श्रीदत्त रोड, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर | जिल्हाधिकारी, सोलापूर | ऑक्टोबर २००५ चे साठा विक्री रजिस्टर, दि. २७.०१.०६ ते माहिती देणेचा दिवस धरून साठा विक्री रजिस्टरची प्रत, वाहतूक पास, नोकरनामे, अनुज्ञाप्ती, देशी मद्य खरेदी बिलाची प्रमाणित प्रत. | आवश्यक माहिती अपीलकर्त्यास दिल्याचे सहायक जन माहिती अधिकारी यांनी दि.१७.०६.०८ च्या विशेष अपिल निर्गत कार्यक्रमामधील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | ५०९/ सोलापूर | श्री. शिवाजी हणमंत सुगरे सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर | कक्ष अधिकारी, शिक्षण संचालक कार्यालय (प्राथमिक), मध्यवर्ती इमारत, पुणे - १ | सहसंचालक, (प्राथ), प्राथमिक शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे - १ | कक्ष अधिकारी,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहार, कार्यालयीन टिप्पणी, शासन आदेशानूसार कारवाई केली नसल्यास सबंधित अधिका-यावर केलेली कारवाई, शाळा हस्तांतरणाबाबतची कागदपत्रे, इत्यादी माहिती. | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपील - कर्त्याने दि. १९.६.०८ च्या विशेष अपिल निर्गत कार्यक्रमामधील प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ५५१/ सोलापूर | श्री. शैल राचय्या स्वामी मु. हालहल्ली, पो. वळसंग, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट, जि. सोलापूर | तहसीलदार, अक्कलकोट, जि. सोलापूर | एप्रिल २००७ मध्ये बेडा जंगम जातीचा दाखला मिळण्यासाठी केलेल्या अर्जावर केलेली कार्यवाही, प्रलंबित अर्ज ठेवणा-या अधिका-यांचे नाव व हुद्दा. | आवश्यक ती माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे दि. २४.०३.२००९ रोजी अपीलकर्त्याने आयोगास कळविले आहे. |
| ७ | ६३८/ सोलापूर | श्री. एन. बी. कोळी मु. पो. मखडे, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | अधीक्षक, सामान्य प्रशासन विभाग- २, जिल्हा परिषद, सोलापूर | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद सोलापूर | उपलोकआयुक्त यांच्यासमोर झालेल्या सुनावणी प्रमाणे कोणावर जबाबदारी कायम केली, श्री. माशाळक यांच्या समोर दिलेल्या म्हणण्या-प्रमाणे कोणावर जबाबदारी कायम केली त्याच्या अहवालाच्या प्रती. | आवश्यक ती माहिती मिळाल्याने समाधान झाल्याचे निवेदन अपीलकर्त्याने दि. ६.१०.२००८ रोजी दिले. सदर निवेदनाची प्रत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि.०८.१०.२००८ च्या विशेष अपिल निर्गत कार्यक्रमामधील प्रपत्रासोबत सादर केली आहे. |
| | ८५७/ सोलापूर | श्री. विद्याधर केशरचंद दोशी जिवनतारा, १२६, मोरारजी पेठ, सरस्वती चौक, सोलापूर | माहिती अधिकारी, विभाग क्र २, पिंपरी चिंचवड प्राधिकरण, निगडी, पुणे - ४४ | अध्यक्ष, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी पुणे | श्री. सुरज वितराग दोशी यांनी श्री. अनिल ज. मोरे यांचे नावे प्लॉट हस्तांतर -णासाठी दिलेल्या कागद पत्राच्या प्रती, पा. न. ४२७६ दि. २६.३.०७ वर निर्णयाचा दि. १०.५.०७ आहे. त्यानुसार अर्जाची पुर्तता करण्यात आली होती काय, एक खिडकी योजणेअंतर्गत स्वीकारलेल्या अर्जासोबत संपूर्ण कागदपत्र असल्याची खातरजमा करून स्वीकारली जातात. काय व इतर एकूण ९ मुद्यांची माहिती. | सदर अपील आपसात मिटविण्यात आले आहे. असे अपील -कर्त्याने दि.८.१०.०८ च्या विशेष अपिल निर्गत कार्यक्रमामधील प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | १००६/ सोलापूर | श्री दत्तू सोपान थिटे मु पिरटाकळी, पो. ति-हे, ता मोहोळ, जि सोलापूर | सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उपविभाग, मोहोळ, जि सोलापूर | कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी ग्रामीण विभाग, सोलापूर | वीज, कनेक्शन तोडण्याचा दिनांक, कनेक्शन तोडताना शेवटचा रिडींग नंबर, जुने मीटर बसवून दिल्यानंतर कनेक्शन तोडलेल्या तारखेपर्यंत अर्जदारांने वापरलेले मीटरवरचे रीडींग व युनिट किती, व इतर एकूण ५ मद्यांची माहिती | वीज बिलाबद्दलच्या शंकेचे निरसन झाल्याने अपील मागे घेत असल्याचे अपील - कर्त्याने दि.१२.१२.०८ चे निवेदन अपिलीय प्राधिकारी यांनी दि १९.११.२००८ च्या पत्राने आयोगास कळविले आहे. |
| १० | १०४०/ सोलापूर | श्री. रामगोंडा शिवनिंगप्पा पाटील व्दारा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सोलापूर | उप अभियंता, जिल्हा परिषद उपविभाग, द. सोलापूर जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | मौजे संजवाड ते चिंचोली (नजीक) या रस्त्याचे मोजणी क्षेत्र पुस्तक व साखळी पुस्तक प्रत, सबंधित शेतकरी संमती पत्रक, अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्च झालेले कार्योत्तर मुजंरी आदेश व इतर एकूण ९ मुद्यांची माहिती. | माहिती मिळाली ऊर्वरीत माहिती देण्याबाबत उभयतात एकमत झाले, असे तीनही घटकांनी दि. १९.११.२००८ च्या विशेष अपिल निर्गत कार्यक्रमामधील प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते १० (अपील क्र १६/ सोलापूर, १७/ सोलापूर, १८/ सोलापूर, २१/ सोलापूर, ५०९/ सोलापूर, ५५१/ सोलापूर, ६३८/सोलापूर, ८५७/सोलापूर, १००६/सोलापूर, १०४०/ सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि ३०. ०६.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १६२/ २००९/ कोल्हापूर | श्री. मंदार मानसिंग पाटील २७१ ए वॉर्ड, शिवाजी पेठ, मरगाई गल्ली, कोल्हापूर-१२ | जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, करवीर, जि.कोल्हापूर | तहसीलदार, करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | सात-बारा उतारा, आठ-अ उतारा, एक-ई उतारा देण्यासाठीची कार्यपध्दती व जबाबदारी इ.४ प्रश्नाची माहिती | अपिलासोबत विहित शुल्क (रु.२०/-) जोडलेले नाही. |
| २ | २०६/ २००९/ कोल्हापूर | श्री. अशोक रामचंद्र सुतार मु.पो.हेर्ले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | नगर भूमापन अधिकारी, हातकणंगले, ता.हातकणंगले जि.कोल्हापूर | अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर | मु.पो.हेर्ले येथील घर नं.११९७, चालता नं.२८१ च्या प्रॉपर्टी कार्डाला श्री. गुलाब रसूल जमादार यांचे नाव लागले संदर्भातील एकूण ३ मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकारी यांनी दि. ८.४.२००९ रोजी योग्य उत्तर दिले आहे. |
| ३ | २०७/ २००९/ कोल्हापूर | डॉ.सत्यजीत पांडुरंग पाटील सी-३५११, के.सी.पी. कळंबा, कोल्हापूर-०७ | वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रूग्णालय, चंदगड, जि.कोल्हापूर | जिल्हा शल्य चिकीत्सक, सी.पी.आर. हॉस्पिटल, कोल्हापूर | पोस्ट मॉटेम एक्झामिनेशन व क्लिनिकल प्रॅक्टीस बाबत अभिप्राय. | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. अभिप्राय मागणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २०९/ २००९/ कोल्हापूर | श्री. अशोकराव आनंदराव भंडारे सि.स.नं.१५२, ई.वॉर्ड, सदर बजार, कोल्हापूर | नगर अभियंता, कोल्हापूर महानगर पालिका, कोल्हापूर | उप आयुक्त, कोल्हापूर महानगर पालिका, कोल्हापूर | कोल्हापूर महानगर-पालिकेच्या स्थायी समितीच्या दि. १३.२. २००९ रोजी झालेल्या सभेमध्ये श्रीमती मंगला ठोकळे, नगरसेविका यांनी प्रभाग क्र.११ मधील अतिक्रमणे हटविण्याबाबत उपस्थित केलेले प्रश्न व त्यास प्रशासनाकडून दिलेल्या उत्तराचा वृत्तांत | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. अभिप्राय मागणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |
| ५ | २६०/ २००९/ कोल्हापूर | श्री. मंदार मानसिंग पाटील २७१ ए वॉर्ड, शिवाजी पेठ, मरगाई गल्ली, कोल्हापूर-१२ | जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, करवीर, जि.कोल्हापूर | तहसीलदार, करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर | सात-बारा उतारा, आठ-अ उतारा, एक-ई उतारा देण्यासाठीची कार्यपध्दती व जबाबदारी इ.४ प्रश्नाची माहिती | अपिलासोबत शुल्क पोस्टाच्या तिकिट स्वरूपात जोडले आहे. |
| ६ | २८५/ २००९/ कोल्हापूर | श्री. बाबासो मल्लाणा कांबळे मु.पो.घोसरवाड, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय घोसरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | गट विकास अधिकारी, शिरोळ, पंचायत समिती, शिरोळ जि.कोल्हापूर | ग्रामपंचायत घोसरवाड, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर यांच्या कामाची माहिती | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली अनु.क्र. १ ते ६ अपिले (क्र. १६२/२००९/कोल्हापूर, २०६/२००९/कोल्हापूर, २०७/२००९/कोल्हापूर, २०९/२००९/कोल्हापूर, २६०/२००९/कोल्हापूर व २८५/ २००९/कोल्हापूर ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १९.६.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे सचिव/ अध्यक्ष, बहुजन एम्प्लॉईज फेडरेशन, ६३९, उत्तर सदर बझार, सोलापूर याची खालील अपिले प्राप्त झाली आहेत. दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :-

| अ क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त |
|---|---|---|---|---|
| १ | १७/ २००९/ सोलापूर | अध्यक्ष/ सचिव, राणी लक्ष्मीबाई महिला विकास प्रबोधन प्रतिष्ठान, ६२२, शुक्रवार पेठ, सोलापूर | सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर | संस्थेची १९९६ पासूनची ऑडिट रिपोर्टची छायांकित प्रत, संस्थेत केलेल्या कर्मचा-यांच्या नेमणुकीचे ठरावाची प्रत, संस्थेमार्फत चालणा-या सन २००४ ते २००८ पर्यंतच्या ऑडीट रिपोर्टरची प्रत, दि. २८.५.०५ रोजीच्या ठरावाची प्रत, आणि कर्मचा-यासबंधीचे ठराव इ. माहिती. |
| २ | २९०/ २००९/ सोलापूर | अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोदणी कार्यालय, सोलापूर | सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर | राणी लक्ष्मीआई महिला विकास प्रबोधन प्रतिष्ठान या संस्थेच्या गैरकारभाराबाबत केलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, संस्थेने आपणाकडे एकही ऑडीट रिपोर्ट पाठविला नाही याबद्दल सार्वन्यासाकडून मुदतवाढ किंवा विशेष सवलत देण्यात आली असल्यास त्याबाबतची माहिती. सदर संस्थेस देण्यात कोणत्या नियमानूसार नोंदणी पमाणपत्र देण्यात आले त्याची माहिती, सदर संस्थेच्या कामकाजाबाबत तक्रारी प्रपप्त झाल्यानंता तक्रारीच्या निर्वाणार्थ नियंत्रण ठेवण्याचे अधिकारी अथवा प्रशासकीय जबाबदारी कोणत्या कार्यालयाकडे आहे त्या कार्यारलयाचे नाव व पत्ता इत्यादी. |
| ३ | १५४८/ सोलापूर | माहिती अधिकारी, विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, पुणे | विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे | पत्र क्र. पु. वी/ अपंग/ न्यास/ सहारा/ रमा/ २००७- ०८/ १२१३/ दि.३०.६.०७ ची समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांनी विहित मुदतीत व संपूर्ण अंमलबजावणी केली किंवा नाही, सदर पत्राच्या अनुषंगाने आपणाकडेअहवाल पाठविला असल्यास त्याची प्रत, रमाबाई अपंग प्रशिक्षण केंद्र सोलापूर येथील श्री. हारून अ. अजीज पठाण यांच्या विषयाची माहिती, व उतर एकूण ५ मुद्यांची माहिती. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | १५४९/ सोलापूर | उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सोलापूर | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सोलापूर | मोहम्मदीन एज्युकेशन सोसायटी संचालित पंडित जवाहरलाल नेहरू ऊर्दू गर्ल्स अँड बॉईज स्कूल, सोलापूर शाळेचे वार्षिक तपासणी अहवाल २००५ -२००६ ते २००७ -२००८, संस्थेस तांदळाचा पुरवठा केव्हा सुरू केला, त्याचा कोटा किती, संस्थेच्या शिक्षकाची वैयक्तिक मान्यता केंव्हापासून देण्यात आली, संसथेच्या सर्व शिक्षकांच्या नियुक्तीचे ठराव आदेश, रूजू अहवाल, नियुक्ती आदेश. |
| ५ | १५५०/ सोलापूर | माहिती अधिकारी, विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, पुणे | विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे | दि. १०.३. २००८ रोजी दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही झाली, सर्व पत्रांच्या साक्षांकित प्रती , वरील अर्जाच्या कार्यवाहीनंतर घेण्यात आलेल्या अंतिम निर्णयाची साक्षांकित प्रत, दि.४.४.०८ च्या २८.३.०८ अर्जाची प्रत आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केली त्यावर केलेल्या कार्यवाहीची साक्षांकित प्रत. |

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नियम ६(१) नुसार अपील व्यक्तीच्या नावे करणे आवश्यक आहे, पदनामाने नाही. उपरोक्त अपिले पदनामाने केलेली आहेत. त्यामुळे ती दाखल पात्र ठरत नाहीत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र १७/२००९/ सोलापूर, २९०/२००९/ सोलापूर, १५४८/ सोलापूर, १५४९/ सोलापूर, १५५०/ सोलापूर/ ) निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २५.०६.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**